नि.फौ.के. नं. ६०/२०२४
महाराष्ट्र शासन वि. विघ्नेश भेरे व इतर
निशाण क्र. ५०

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – अविनाश सुरेश गुरव,

**वय –** ३६ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**राहणार –** बोंडे, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर</u>**

**<u>यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक १२/०५/२०२४ रोजी मी माझ्या घरी हजर होतो. त्यादिवशी आमच्या वाडीमध्ये श्री. सत्यनारायणाची सार्वजनीक पुजा होती. दुसऱ्या दिवशी १३ तारखेला यशवंत सोमा गुडेकर यांच्या घरी मिटींग आयोजीत केली होती. सदरची मिटींग रात्री १०:०० ते १०:३० वाजताच्या दरम्यान होती. सदर मिटींगमध्ये वाडीतील २५ ते ३० लोक हजर होते. पुढे काय झाले, हे माझ्या आता लक्षात नाही. मिटींगमध्ये केवळ हिशोबाबाबत चर्चा झाली होती.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०२**. हे म्हणणे खरे आहे की, कल्पेश गुरव हा आमच्या मंडळाचा उपाध्यक्ष असुन तो त्यादिवशी मिटींगला आला नव्हता. विघ्नेश भेरे हा त्यादिवशी मिटींगला आला होता काही नाही, हे माझ्या लक्षात नाही.

**०३**. *(साक्षीदारास तक्रार दाखविण्यात आली). त्यावर माझी सही आहे. ती सही मी पोलीस ठाण्यात केली होती का, हे मला आता आठवत नाही. त्यातील मजकुराबाबत मला आठवत नाही. (**<u>सही पुरत्या भागास निशाणी क्रमांक</u>***

***५१*** *देण्यात येते). (साक्षीदारास घटनेचा प्राथमिक अहवाल दाखविण्यात आला). त्यावर माझी सही आहे. ती सही मी पोलीस ठाण्यात केली होती का, हे मला आता आठवत नाही. त्यातील मजकुराबाबत मला आठवत नाही. (****सही पुरत्या भागास निशाणी क्रमांक ५२*** *देण्यात येते).*

०४. *(साक्षीदारास तक्रारी जबाबातील* ***चिन्हांकित भाग – अ कडील मजकुर वाचुन*** *दाखविण्यात आला). सदरचा मजकुर बरोबर आहे का, हे मला आता आठवत नाही. सुजीत चव्हाण, सचिन गुरव यांना मी ओळखतो. दिनांक १४ रोजी पोलीस व सुजीत चव्हाण, सचिन गुरव हे घटनास्थळी आले होते का, हे मला आता आठवत नाही.*

०५. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी, पोलीस, आदित्य भेरे, सुजीत चव्हाण व सचिन गुरव असे पंचनाम्यासाठी घटनास्थळी जमलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळ मी दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी पोलीसांना एक काळया रंगाचा हाफ बर्मुडा दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आदित्य भेरे याने त्याच्या अंगावरील रक्ताचे डाग असलेला टि–शर्ट पोलीसांना काढुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेथुन पोलीसांनी एक लाकडी गोल दांडा असलेली कुदळ जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्यावेळी घटनास्थळाचा नकाशा रेखाटला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा पोलीसांनी दुपारी ०१:०० ते ०२:३० वाजेपर्यंत केला होता.*(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). त्यावर घटनास्थळ दाखविणार म्हणुन अनुक्रमांक ०१ कडे माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला आठवत नाही. (****सही पुरत्या भागास निशाणी क्रमांक ५३*** *देण्यात येते).*

०६. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्रात ०५ अंक लिहिलेला मी दिसुन येत आहे.*

*अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्रात बर्मुडा मी दाखवित असल्याचे दिसत आहे. अनुक्रमांक ०३ व ०४ कडील छायाचित्रांत मी हजर असल्याचे दिसुन येत आहे. अनुक्रमांक ०५ कडील छायाचित्रात मी सही करताना दिसत आहे. त्यामध्ये मी कशावर सही करीत आहे, हे मला सांगता येत नाही. (सदर **छायाचित्रांना ओळखीकरीता वस्तु – अ देण्यात** देण्यात येते).*

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाबाहेर तडजोड होवुन आमच्यातील वाद आता मिटलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तडजोड झाल्यामुळे आरोपींना वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडुन –**

**०८.** हे म्हणणे खरे नाही की, वस्तु अ कडील छायाचित्रांत मी हजर असल्याचे दिसत असल्याचे मी सरतपासात खोटे कथन केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.19 17:35:51 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक १९.१२.२०२५
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 19/12/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 19/12/2025 |
| Evidence uploaded on | :- | 19/12/2025 |